**मुख्य लेखाशिर्ष २२०५-कला व संस्कृती - ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) योजनांतर्गत याखाली पूरक मागणीद्वारे अतिरिक्त अनुदान मंजूर करणेबाबत.**

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक - पूरक-१०१२/ ३०४/प्र.क्र. ६५/२०१२/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
**दिनांक - २७ ऑगस्ट, २०१२**

**संदर्भ : शासन परिपत्रक मराठी भाषा विभाग क्र.अर्थसं-२०१२/प्र.क्र.१०९/आस्था-३, दिनांक २२ ऑगस्ट, २०१२.**

**प्रस्तावना :-**

सन २०१२-१३ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र दिनांक ९ जुलै, २०१२, रोजी महाराष्ट्र विधानमंडळास सादर करण्यात आले होते. सदर पुरवणी खर्चास पावसाळी अधिवेशनामध्ये विधानमंडळाने मान्यता दिली असून सदर पुरवणी विनियोजन विधेयक मा. राज्यपालांच्या संमतीनंतर महाराष्ट्र (पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०१२ (सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४, क्रमांक २२, दिनांक २४ जुलै, २०१२ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे.

वरील राजपत्रामध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ या कार्यालयास योजनेतर तरतूदीअंतर्गत खालील उद्दीष्टांकरीता अपेक्षित असलेला खर्च भागविण्यासाठी रु.५१,४०,०००/- (रुपये एकावन्न लक्ष चाळीस हजार फक्त) इतका अतिरिक्त निधी पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आला आहे.

| **अ.क्र.** | **उद्दीष्ट** | **सन २०१२-२०१३ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेला अतिरिक्त निधी** |
|---|---|---|
| १ | ०६ - दूरध्वनी, वीज व पाणीशुल्क | ४०,०००/- |
| २ | १३- कार्यालयीन खर्च | १,००,०००/- |
| ३ | १६ - प्रकाशने | ६,००,०००/- |
| ४ | ३१ - सहायक अनुदान (वेतनेतर) | ४४,००,०००/- |
| | **एकूण** | **रु.५१,४०,०००/-** |

सदर निधी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिव, यांचेकडे उपरोक्त बाबींवर खर्च करण्यासाठी या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर निधी विनियोजन अधिनियमानुसार मंजूर झालेल्या पूरक मागण्यांच्या अनुषंगाने माहे सप्टेंबर, २०१२ पर्यंतचे मासिक निधी विवरणपत्र तयार करुन तसेच ते मान्य करुन अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर भरण्यात यावे व त्याची प्रत तात्काळ शासनास सादर करावी.

३. या बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडएफ-२, मुख्य लेखाशीर्ष २२०५ - कला व संस्कृती (००) १०२, कला व संस्कृती प्रचालन -(०१) (योजनेतर योजना) - (०१) (०१) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३१७२) या लेखाशीर्षाखाली सन २०१२-१३ या वर्षात पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

.......२/-

४. यासाठी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, यांना किंवा त्यांनी घोषित केलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांस यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४३८/१२/व्यय-४, दिनांक २६ जून, २०१२ नुसार व अनौपचारिक संदर्भ क्र. ५८१/अर्थसंकल्प १४, दि.९ जुलै, २०१२ नुसार प्राप्त झालेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संगणक संकेतांक क्र.२०१२०७१०१६५९०३७५३३)

(सुरेश पेडगांवकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
४. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
५. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
६. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
७. वित्त विभाग (व्यय - ४ / अर्थसंकल्प - १४), मंत्रालय, मुंबई,
८. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
९. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
**१०. भाषा - ३ (संग्रहार्थ).**